महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## जाहिरात क्र. ०५/२०१४ अन्वये ई.एस.बी.सी. (शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग) प्रवर्गातुन "विद्युत सहाय्यक" पदाकरीता निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रे पडताळणीबाबत.

१) महावितरणमध्ये **"विद्युत सहाय्यक"** या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरिता तीन वर्षाच्या निश्चित कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने उमेदवारांची निवड करण्याकरिता जाहिरात क्र. ०५/२०१४ ही माहे ऑगस्ट २०१४ मध्ये प्रसिद्ध केली होती. जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३०/०९/२०१४ अशी होती.

२) शासन निर्णय दिनांक ०४/०७/२०१९ व दिनांक ११/०७/२०१९ मध्ये नमूद केलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने ईएसबीसी प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना एसईबीसी प्रवर्गातून निवड करण्यात आली आहे. ईएसबीसी प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी व या संबंधातील सुचना दिनांक १७.०९.२०१९ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

३) ऑनलाईन अर्जामध्ये नोंदविलेल्या नोंदी संबंधी दस्ताऐवज / दाखले छाननीकरिता सादर करणे ही सर्वस्वी संबंधित उमेदवाराची जबाबदारी आहे. ऑनलाईन अर्जामधील व जाहिरातीमधील अर्हतेबाबत नमूद केलेली कागदपत्रे ज्या दिवशी कागदपत्रे पडताळणी होतील त्यादिवशी सादर करु शकले नाहीत तर त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल आणि यास उमेदवार सर्वस्वी जबाबदार राहील.

४) निवड झालेल्या उमेदवारांचे दस्ताऐवज / कागदपत्रे छाननी केल्यानंतर जे उमेदवार पात्र होतील अशा उमेदवारांना तीन वर्षाच्या निश्चित कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीवर "विद्युत सहाय्यक" म्हणून नेमणूक देण्यात येईल.

५) निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये नमुद केलेल्या संबंधित प्रमाणपत्रांची प्रत्यक्ष छाननी माहे नोव्हेंबर / डिसेंबर २०१९ मध्ये करण्यात येईल. याबाबत उमेदवारांची परिमंडळनिहाय यादी तसेच कागदपत्रे पडताळणीबाबत दिनांक, वेळ इत्यादी माहिती / सुचना स्वतंत्ररीत्या कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. यांबाबत उमेदवारांनी वेळोवेळी कंपनीचे संकेतस्थळाला (www.mahadiscom.in) भेट द्यावी.

**६) निवड झालेल्या उमेदवारांनी सोबत दिलेल्या URL लिंकवरुन त्यांनी स्वतःचा रजिस्ट्रेशन नंबर, पासवर्ड (जन्मतारीख पासवर्ड म्हणुन वापरणे) च्या आधारे नमुद केलेली कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. सदर लिंक कंपनीच्या संकेतस्थळावर दि्नांक १९.१०.२०१९ पासुन दिनांक ०३.११.२०१९ पर्यंत उपलब्ध राहील.**

**७) दिनांक १७.०९.२०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवड यादी मधील जे उमेदवार तदर्थ (Adhoc) स्वरुपात महाविरतणमध्ये सद्यस्थितीत विद्युत सहाय्यक पदावर कार्यरत आहेत अशा उमेदवारांनी कागदपत्रे अपलोड करण्याची आवश्यकता नाही.**

८) सदर कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतःच करणे आवश्यक आहे. सदर प्रक्रियेमध्ये स्वतः उमेदवाराद्वारे अथवा इतर व्यक्ती द्वारे हेतुपुरस्सर खोटी माहिती अपलोड करणे किंवा त्यात बदल करणे किंवा बनावट दाखले अपलोड करणे तसेच अन्य कोणताही गैरप्रकार करणा-या उमेदवारांस / व्यक्ती विरुद्ध प्रचलित कायदा व नियमाच्या अनुषंगाने योग्य ती कारवाई करण्यात येईल तसेच उमेदवारी रद्द करण्यात येईल याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

९) **कागदपत्रे अपलोड करणेबाबत उमेदवारांना सुचना**

अ) आवश्यक कागदपत्रांची प्रत्येकाची संपुर्ण इमेज स्कॅन करावी. सर्व कागदपत्रे एकत्रित स्कॅन करु नयेत.

ब) प्रत्येक कागदपत्रांची संपुर्ण इमेज स्कॅन करुन संगणकावर वेगवेगळ्या फाईल्स स्वतंत्रपणे PDF स्वरुपात जतन (Save) करावी.

क) प्रत्येक कागदपत्राची साईज / इमेज १०० के.बी. पेक्षा जास्त असता कामा नये. इमेजची साईज १०० के.बी. पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dpi resolution, no of colours etc. द्वारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे.

ड) नमुद केलेल्या कागदपत्राच्या ठिकाणी Click करुन त्याच प्रकारचे कागदपत्रे PDF स्वरुपात अपलोड करावे.

इ) कागदपत्रे अपलोड झाल्यानंतर Submit वर Click करावे.

ई) कागदपत्रे सबमीट केल्यानंतर अपलोड केलेल्या कागदपत्रांमध्ये कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**कागदपत्रे अपलोड करण्यासाठी येथे Click करावे.**

*****